## सभावृत्त

दिनांक :- दि. 06.07.2017

स्थळ :- अप्पर जिल्हाधिकारी यांचे कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा.

विषय :- जिल्हा खाणकाम योजना समिती सभा

---

महाराष्ट्र गौण खनिज उतखनन (विकास व विनियमन) नियम 2013 चे नियम 58 नुसार वर्धा जिल्हयाकरीता जिल्हा खाणकाम योजना समिती ची स्थापना सन 2014 मध्ये करण्यात आली आहे. उक्त समितीची 11 वी सभा दि. 06.07.2017 रोजी दुपारी 3.00 वाजता मा. अप्पर जिल्हाधिकारी यांचे कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय,वर्धा. येथे आयोजित करण्यात आली होती.

अल्प मुदतीचे (तात्पुरते) गौण खनिज परवाने देण्याकरीता जिल्हायातील तहसिलदार यांचेकडुन प्रस्तावित करण्यात आलेल्या क्षेत्रांना मंजुरी प्रदान करण्याकरीता ही सभा घेण्यात आली.

जिल्हा खाणकाम समितीची सभा श्री. संजय दैने, अप्पर जिल्हाधिकारी वर्धा यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली. सभेला उपवनसंरक्षक वर्धा यांचे प्रतिनीधी, वरिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा वर्धा यांचे प्रतिनीधी व जिलहा खनिकर्म अधिकारी हे उपस्थित होतें.

सभेमध्ये मागील मंजुर करण्यात आलेल्या स.नं.च्या यादीची पाहणी करण्यात आली. उपरोक्त सभेत तहसिल कार्यालय वर्धा यांचे -13, तहसिल कार्याल्य देवळी यांचे 2, तहसिल कार्यालय हिंगणघाट यांचे 01, तहसिल कार्यालय कारंजा यांचेकडील -2,असे एकुण 18 प्रस्ताव सभेमध्ये मंजुरीकरीता ठेवण्यात आले.

एकुण 18 पैकी उपसंरक्षक वर्धा , वनविभाग वर्धा यांचे कार्यालयीन पत्र क्र.कक्ष्-16/सर्व्हे -2/16-17/1716 दि. 11.08.2017 अन्वये 10 सर्व्हे नं.करिता नाहरकत अहवाल सादर केलेला असुन दि.23.1.17,दि.2.3.17 व दि. 11.7.17 ला झालेल्या सभेतील 4 सर्व्हे नं ला नाहकरत दर्शविली असुन 03 सर्व्हे नं. खाणकाम आराखडयात समाविष्ट करण्याबाबत हरकत दर्शविली आहे. दि.06.07.2017 रोजी झालेल्या सभेतील 08 सर्व्हे नं. बाबतचा अभिप्राय अद्याप प्रलंबित आहे.

करिता वरीलप्रमाणे वनविभागाचे नाहरकत प्राप्त प्रस्तावित जमिनीस खालील अटी व शर्तीवर अल्प मुदतीचे गौण खनिज उत्खनन परवाने देण्याकरीता जिल्हा खाणकाम योजना मध्ये समाविष्ट करण्यास जिल्हा खाणकाम योजना समितीद्वारे मंजुरी देण्यात येत आहे.

### जिल्हा खाणकाम आराखडा समिती सभा दि. दि. 06.07.2017

| अ.क्र. | तालुका | खनिज उतखननाचे अर्ज प्राप्त किंवा उत्खनन करीता प्रस्तावीत क्षेत्राच्या गांवाची यादी. | सर्वे क्रमाक | एकुण आराजी हे.आर | प्रस्तावित क्षेत्र खाजगी/ शासकीय | उपवनसंरचक्षक वर्धा याचे पत्र क्र.कक्ष-16/सर्व्हे- 02-16-17/1716 दि.11.08.17 अन्वये |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | हिंगणघाट | वडनेर | 375/4 | 2.40 | खाजगी | परवानगी देण्यास हरकत नाही |
| 2 | हिंगणघाट | उमरी | 253/अ | 1.20 | खाजगी | परवानगी देण्यास हरकत नाही |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 3 | हिंगणघाट | केकतविहीरा | 23/3 | 1.26 | खाजगी | परवानगी देण्यास हरकत नाही |
| 4 | हिंगणघाट | खापरी-2 | 61 | 1.67 | खाजगी | परवानगी देण्यास हरकत नाही |
| 5 | हिंगणघाट | उमरी | 239 | 40.23 | खाजगी | परवानगी देण्यास हरकत नाही |
| 6 | वर्धा | पांढरकवडा | 55 | 32.87 | शासकीय | परवानगी देण्यास हरकत नाही |
| 7 | वर्धा | गणेशपुर | 23 | 4.88 | शासकीय | परवानगी देण्यास हरकत नाही |
| 8 | वर्धा | तिगांव | 190 | 60.05 | शासकीय | परवानगी देण्यास हरकत नाही |
| 9 | वर्धा | वाठोडा | 25 | 5.39 | शासकीय | परवानगी देण्यास हरकत नाही |
| 10 | वर्धा | वाठोडा | 27 | 12.37 | शासकीय | परवानगी देण्यास हरकत नाही |
| 11 | वर्धा | वाठोडा | 47 | 18.77 | शासकीय | परवानगी देण्यास हरकत नाही |
| 12. | वर्धा | डोरली | 69 | 24.53 | शासकीय | परवानगी देण्यास हरकत नाही |
| 13 | वर्धा | निमगांव | 296 | 1.97 | खाजगी | परवानगी देण्यास हरकत नाही |
| 14 | वर्धा | निमगांव | 139 | 1.17 | खाजगी | परवानगी देण्यास हरकत नाही |

1] विटासाठी माती काढतांना कोणत्याही स्फोटकाचा वापर करण्यात येणार नाही. मुरूम व दगड उत्खननाकरीता विनापरवानगीने स्फोटकाचा वापर करण्यात येवू नये. तसेच परवानगी मिळाल्यास विहित परवाना प्राप्त व्यक्तीद्वारे सुरूंग स्फोटकाचा वापर करता येईल.

2] जमिनीच्या पातळीपासुन 2 मीटर पेक्षा जास्त खोल खोदण्यात येवु नये. तसेच भुजल पातळीपासुन 2 मीटरच्यावर पर्यंतच माती उत्खनन करण्यात यावे. उदा. पाण्याची पातळी 3 मीटर वर असल्यास जमिनीच्या पातळीपासुन 1 मीटर पर्यंतचे खोदकाम करता येईल.

3] मातीचे खोदकाम करतांना नैसर्गीकरित्या वाहत जाणाऱ्या पाण्याच्या कोणत्याही प्रवाहाची दिशा बदलण्यात येणार नाही.

4] माती खोदकाम केल्यामुळे निर्माण झालेल्या खडयाच्या पाण्याचे पुन:भरण होईल या दृष्टीने उपयोग करावा. उदा. पाझर तलाव किंवा बोडी तयॉर करावी.

5] खोदकामाच्या ठिकाणी चारही बाजुंनी कुंपण करण्यात यावे, जेणेकरून कुणी खडयात पडुन अपघात होणार नाही. तसेच त्या ठिकाणावर धोक्याचा इशारा असलेले फलक सुध्दा लावणेत यावे.

6] खोदकामापासुन मातीची वाहतुक अन्य ठिकाणी करण्यात येत असल्यास अशा वाहनातील मालाला ताडपत्रीने झाकण्यात यावे, जेणेकरून प्रदुषण होणार नाही.

7] खोदकामामुळे निर्माण झालेल्या खडडयामध्ये डास निर्माण होणार नाहीत याबाबत आवश्यक ती उपाययोजना करण्यात यावी.

8] खोदकाम करणाऱ्या मजुरांच्या सोयीसाठी पिण्याच्या पाण्याची व शौचालयाची व्यवस्था करणे बंधनकारक असेल.

9] खोदकाम करतांना किती खोल खोदकाम केलेले आहे याची माहिती होण्यासाठी मुळ मातीचा 1 मीटर रूंदीचा 1 स्तंभ जशाच्या तसा ठेवण्यात यावा. असा स्तंभ शेजारच्या सर्व्हे नंबरच्या सीमा रेषेला लगतचा असावा.

10] उत्खननाकरीता प्रस्तावित सर्व्हे नं. वनसदृष्स जमीनीच्या यादीतील नसावा.

11] गौण खनिज वाहतुकीसाठी वनजमीनीचा वापर करता येणार नाही.

12] कोणत्याही निस्तार हक्काला बाधा पोहोचत असल्यास निस्तार अधिकाऱ्यांची परवानगी घेणे आवश्यक राहील.

13] पाणी पुरवठयाच्या स्त्रोतापासुन 200 मीटर अंता असावे.

14] प्रस्तावित जमिन ही अभयारण्याचे हद्यीपासुन 1 कि.मी. अंतराचे वर असावे.

वरीलप्रमाणे अटी व शर्तीचे अधीन राहुन यादीत समाविष्ट जमिनीकरीता तात्पुरते गौण खनिज परवाने देण्यास हरकत नसल्याबाबत सर्व उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांना पत्राद्वारे कळविण्यात येईल.तसेच वनविभागाचे अभिप्रायाकरीता प्रलंबित प्रस्तावा संदर्भात आवश्यक कार्यवाहीकरीता उपवनसंरक्षक,वनविभाग वर्धा यांना कळविण्यात येईल.

**अप्पर जिल्हाधिकारी,**
**वर्धा.**

**जिल्हा खनिकर्म अधिकारी ,**
**वर्धा.**